# गाढवाची अडचण

मराठी : अश्विनी बर्वे

एक दयाळू आणि सरळ स्वभावाचा माणूस आपल्या नातवा बरोबर वाळवंटात राहत होता. खूप कष्ट केल्यानंतरच त्याला जीवनात समृद्धी दिसली नव्हती. जसजसा काळ पुढे गेला तसतशी त्याची संपत्ती कमी होत गेली.शेवटी त्याच्याकडे काहीच राहिले नाही. घर चालविण्यासाठी त्याला आता गाढव विकावे लागणार होते. मग एक दिवस ते तिघे वाळवंटातील एका गल्लीतून बाजाराकडे निघाले.



थोडे पुढे गेल्यावर त्यांना दोन मुले दिसले, “त्या मूर्खांना बघ,” मुलांनी त्यांची चेष्टा करत म्हणाले. “ते उन्हात वाळूवरून पाय पोळत चालण्याऐवजी गाढवावर बसून जावू शकतात.”



वृद्ध माणसाने त्यांच्या म्हणण्याचा गंभीरपणे विचार केला. बाजार अजून दूर होता. “त्यांनी बरोबर म्हटले आहे,” त्याने विचार केला आणि जबरदस्ती करून त्याने मुलाला गाढवावर बसवले. आणि तो माणूस पायी चालू लागला.



सूर्य आकाशात वर आला होता. काहीवेळाने त्यांना प्रवास करणाऱ्या माणसांचा समूह भेटला. ते ही बाजारात जात होते.त्यातला एक ओरडला, “बघा ज्याचे पाय मजबूत आहेत तो तरुण स्वतः गाढवावर बसला आहे आणि म्हातारा त्याला ओढण्यासाठी कष्ट घेत आहे.”



शरमेने मुलाने मान खाली घातली. “त्याने बरोबर म्हटले आहे.”मुलाने आजोबांना म्हटले. तशी त्याने आजोबांनी त्याच्याशी खूप युक्तिवाद केला. पण मुलाने अजिबात ऐकले नाही. त्याने आपल्या जागी गाढवावर आजोबांना बसवले.



आता वाळवंट तापू लागले होते. मग त्यांना विहिरीवून पाणी आणणाऱ्या महिलांशी झाली. “किती निर्दयी माणूस आहे,” त्यातल्या एका महिलेने म्हटले. “बघ एवढ्या कडक उन्हात तो माणूस लहान मुलाला त्रास देत आहे.”



म्हातारा आणि त्याचा नातू लोकांच्या बोलण्याला आणि टोमण्यांना वैतागले होते. “शेवटी आपण करायचे तरी काय?” ते दुःखी होवून विचार करू लागले. खूप विचार केल्यानंतर त्यांना उत्तर मिळाले, जे त्यांना योग्य वाटले.....



. . . तेव्हा त्यांना शहराच्या बाहेर एक बुद्धिमान व्यक्ती भेटली. "तुम्हांला काही अंदाज आहे की नाही? त्या गरीब जनावरावर तुम्ही किती ओझे टाकत आहात ते?" तो म्हणाला, "जेव्हा तुम्ही दोघे त्या जनावराला उचलून घ्याला तेव्हा तुम्हांला त्याचा अंदाज येईल."



दोघांना आपण जनावरा बाबत खूप निर्दयी वागलो याची लाज वाटली. आणि त्यांना त्या माणसाने सुचवलेला पर्याय समजुतीचा वाटला.



ही गोष्ट चहूकडे पसरली की, एक सरळ आणि दयाळू माणूस आपल्या नातवाला घेवून येत आहे.

लवकरच सगळे शहर तो नजारा बघण्यासाठी नदीवर जमले.



गर्दी त्यांच्याकडे बघून
खदाखदा हसत होती.
हसण्याने दचकून



.....गाढवाने लाथ
मारून स्वतःला
मुक्त केले...

आणि मग म्हाराऱ्याला आणि त्याच्या
नातवाला सोडून ते गाढव नदीत उडी
मारून निघून गेले.... आता त्या
म्हाताऱ्या माणसाजवळ आणि
त्याच्या नातवा लोकांच्या
खोट्या ज्ञानाशिवाय
काहीच उरले नाही.

...समृद्धी साठी लोकांनी आपला
आतला आवाज ऐकला पाहिजे.

समाप्त